**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अछावृ - २०२२/प्र.क्र.१३४/का.१९**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०२३

**वाचा:**

१. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टिआरआय २००८ / प्रक्र. १६८ / का-५, दिनांक १५ मार्च, २०११,
२. आदिवासी विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक टिआरआय २००८ / प्रक्र. १६८ / का-५, दिनांक २६ एप्रिल २०११ व १० जून, २०११.
३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्र. आसंप्रसं-२०२२/ का.४(सं) /अधिछात्रवृत्ती/४२२, दिनांक २२.०९.२०२२.

**प्रस्तावना**

आदिवासी क्षेत्रामधील सामाजिक व आर्थिक बदलांच्या प्रक्रियेचा व आदिवासी जमातीचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अनुसूचित जमातीच्या २ उमेदवारांकरिता संशोधन अधिछात्रवृत्ती ही योजना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ चे शासन निर्णयांन्वये राबविण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयान्वये संशोधन अधिछात्रवृत्तीचा दर हा दरमहा रु. २८००/- व प्रती वर्षी सादिलवार खर्चाकरिता रु. १०,०००/- निश्चित करण्यात आलेला आहे. सदर दरामध्ये सन २०११ नंतर सुधारणा करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी बार्टी, पुणे यांचेमार्फत मराठा व कुणबी जातीतील उमेदवारांसाठी सारथी, पुणे तसेच इतर मागासवर्गीय जाती, भटक्या व विमुक्त जमाती मधील उमेदवारांसाठी महाज्योती, नागपूर यांचेमार्फत पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी आर्थिक सहाय्य योजना राबविली जाते. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरिता देखील पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी अधिछात्रवृत्ती देण्याकरिता योजना सुरु करण्यात यावी अशी मागणी राज्यातील विविध आदिवासी लोकप्रतिनिधी व संघटनांकडून करण्यात येत होती. त्यामुळे सद्यस्थितीत सुरु असलेल्या संशोधन अधिछात्रवृत्तीमध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश करुन योजनेचा लक्षांक वाढविणे व अधिछात्रवृत्तीच्या रकमेत सुधारणा करणेबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून उपरोक्त संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र राज्यातील १०० अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना दरवर्षी पी. एच. डी. अभ्यासक्रमासाठी संशोधन अधिछात्रवृत्ती देणे या योजनेस व सदर योजनेच्या

अंमलबजावणीसाठी सोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ मधील मार्गदर्शक सूचनांना या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजना राबविण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना आहरण व संनियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत योजनेकरिता येणारा खर्च मागणी क्र. टी-२, २२२५-अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्ग कल्याण (०५) संशोधन व प्रशिक्षण(०५) (०१) जनजाती संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (२२२५ १३०१) ३४ या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेलल्या निधीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ६५/व्यय-१४, दिनांक २४.०१.२०२२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२३०२०३१६४०४७२९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Vijay Waje

Digitally signed by Prakash Vijay Waje
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=1b4b695a8c26d140fc5c049d281eedbf23beed9a89ad75264161
f14776, pseudonym=23F17B7ABBFC6358B3073C61D025B7893A825E9
serialNumber=400892E5E82479E4F3C8CF46538DC917B7071E979796D3
3B709E19155AB, cn=Prakash Vijay Waje
Date: 2023.02.03 16:46:21 +05'30'

(प्रकाश वि. वाजे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.
२) मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६) मा.उपाध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
८) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव ,मंत्रालय,मुंबई.
९) मा. सर्व मंत्री, यांचे खाजगी सचिव.मंत्रालय,मुंबई.
१०) मा. सर्व राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
११) मा. विधानसभा / विधान परिषद, सदस्य सर्व
१२) मुख्य सचिव,यांचे उप सचिव,मंत्रालय,मुंबई
१३) अ.मु.स./प्र.स./सचिव,विभाग सर्व ,मंत्रालय मुंबई.
१४) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१६) सर्व जिल्हाधिकारी,

१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

१८) व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक.

१९) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.

२०) महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई

२१) महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.

२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२४) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२५) सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.

२६) उप सचिव ( व्यय-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद

२८) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

२९) निवड नस्ती (कार्यासन-१९), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## विवरणपत्र-अ

### शासन निर्णय क्र.अछावृ-२०२२/प्र.क्र.१३४-का/१९,दि .३ फेब्रुवारी ,२०२३ चे विवरण पत्र

**योजनेचे नाव** : महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पी. एच. डी. या अभ्यासक्रमासाठी संशोधन अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) देणे.

**योजनेचा उद्देश:**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या पी.एच.डी. करण्यासाठी अधिकतम पाच वर्षांसाठी फेलोशिप द्वारे अर्थसहाय्य करणे.

**उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया :**

महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या व सदर संशोधन अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) घेऊ इच्छित असणाऱ्या व या योजनेकरिता साधारण पात्रता व निकष पूर्ण करीत असलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून अर्ज मागविले जातील. याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण या संस्थेमार्फत राज्यस्तरीय व सर्वदूर पोहोचणाऱ्या तसेच सर्वाधिक खपाच्या महत्वाच्या दैनिकांमध्ये जाहिरात देण्यात येईल. उमेदवारांना या योजनेचा फायदा केवळ एकदाच घेता येईल.

**लाभार्थी संख्या :** १०० प्रति वर्ष

**उमेदवारांसाठी सर्वसाधारण पात्रता निकष:**

१. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीमधील असणे आवश्यक आहे.
३. या योजनेसाठी अर्ज करते वेळेस उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
४. उमेदवार हा कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी धारक असावा. उमेदवार व्यक्तीने पदव्युत्तर पदवी परीक्षा ही शासकीय अथवा सरकारमान्य विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थामार्फत उत्तीर्ण केलेली असावी. तसेच सदर योजनेसाठीची इतर अर्हता, शिक्षण, वय व इतर पात्रता व अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.
५. अनुसूचित जमातीच्या उमेदवाराचे व त्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळून वार्षिक **उत्पन मर्यादा रु. ८,००,०००** ( अक्षरात रुपये आठ लक्ष फक्त ) यापेक्षा कमी असावे.
६. सदर योजनेचा लाभ घेणेसाठी उमेदवाराची कमाल **वयोमर्यादा ४५ वर्ष** इतकी असेल.
७. उमेदवाराने पी.एच.डी. धारण करण्याकरिता भारतातील सरकारी अथवा सरकारमान्य विद्यापीठ/महाविद्यालय/संस्था येथे एप्रिल, २०२१ नंतर नोंदणी केलेली असावी.
८. राज्यातील आदिम जमातीच्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
९. नियमानुसार मुली व दिव्यांग यांच्यासाठी अनुक्रमे ३० % व ४ % जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा अनुसूचित जमातीतील गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास दिली जाईल.

१०. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

११. उमेदवार पी.एच.डी. करीत असलेल्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाचा पूर्णवेळ अथवा अर्धवेळ रोजगार/स्वयंरोजगार करीत असल्यास किंवा विद्यापीठ/महाविद्यालय/संस्था यांचेकडून पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही प्रकारचे अर्थसाह्य/मानधन/शिष्यवृत्ती घेत असल्यास या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

१२. उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव पी.एच.डी. करणे अर्धवट सोडावयाचे असल्यास त्या उमेदवारास प्राप्त झालेली फेलोशिप आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस जमा करावी लागेल.

१३. विद्यार्थ्याने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२. जर संस्थेने पुरविलेल्या निवास व्यवस्थेचा लाभ उमेदवार घेणार नसल्यास, त्याने/तिने निवास व्यवस्थेचा पत्ता व हमीपत्र आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस कळविणे/देणे बंधनकारक आहे व उमेदवाऱ्याच्या सुरक्षेची जबाबदारी स्वत: उमेदवारांची राहील.

३. सदर योजनेमधील फेलोशिप चा लाभ घेण्यासाठी ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे. तसे प्रमाणपत्र विद्यापीठ/महाविद्यालय/संस्था मधून संशोधन मार्गदर्शक (Research Guide) यांच्याकडून प्राप्त करून आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे जमा करणे आवश्यक आहे. परंतु विद्यार्थी गंभीर आजारी पडणे, अपघात होणे (नैसर्गिक आपत्ती/कौटुंबिक समस्या/वैद्यकीय कारण) या कारणामुळे अनुपस्थित असल्यास अपवादात्मक परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना फेलोशिप अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

४. ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांची निवड झाल्यानंतर तात्काळ रुजू होणे बंधनकारक असेल व ७ दिवसाच्या आत हमीपत्र आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस जमा करणे आवश्यक आहे. जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रुजू होत नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करून त्यांना योजनेचा लाभ देण्यात येईल. या संदर्भात काही समस्या उद्भवल्यास त्याबाबतची कारणमीमांसा पडताळून अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

**<u>उमेदवाराची निवड प्रक्रिया:</u>**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेमार्फत महत्वाच्या दैनिकांमध्ये याबाबत जाहिरात देऊन प्रथमतः सदर योजनेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येतील. तर प्राप्त अर्जांची संख्या २०० पेक्षा जास्त असल्यास उमेदवारांची निवड करण्यासाठी विद्यापिठ प्रवेश परिक्षेच्या धर्तीवर प्रवेश परिक्षेचे आयोजन करण्यात येईल. सदर परिक्षेमध्ये उमेदवारांस आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी निश्चित केलेले किमान गुण प्राप्त करणे बंधनकारक असेल. परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रकाशित केली जाईल. २०० पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांचे अर्ज प्राप्त

करणेपासून परिक्षा घेणे ते कागदपत्रांची तपासणी करुन प्रवेश देण्यापर्यंतची कामे करण्यासाठी राज्यस्तरीय दैनिकांमध्ये जाहिरात देवून ऑनलाईन / ऑफलाईन परिक्षा घेणाऱ्या विविध संस्थांची ई-टेंडर प्रक्रिया राबवून निवड करण्यात येईल. याकरिता येणारा खर्च योजनेंतर्गत प्राप्त तरतूदीमधून करण्यात येईल. जर उमदवारांची संख्या २०० पेक्षा कमी असेल तर उमेदवारांस पदवी व पदवीत्तर पदवी परिक्षेमध्ये प्राप्त गुणांची सरासरी काढून गुणानुक्रम यादी प्रकाशित केलेली जाईल.

प्रवेश परिक्षेत प्राप्त कागदपत्रांची छाननी करणे व मुलाखत घेण्यासाठी अनुसूचित जमाती संशोधन अधिछात्रवृत्ती निवड समिती स्थापन करण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | समिती तील पदनाम |
|---|---|---|
| १ | सह संचालक , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| २ | उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | उपाध्यक्ष |
| ३ | विशेष तज्ञ (कला/वाणिज्य) शाखा | सदस्य |
| ४ | विशेष तज्ञ (विज्ञान / अभियांत्रिकी / वैद्यकिय ) शाखा | सदस्य |
| ५ | विशेष तज्ञ (मानववंश शास्त्र) शाखा | सदस्य |
| ६ | विशेष तज्ञ (आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती ) | सदस्य |
| ७ | संशोधन अधिकारी (संशोधन) | सदस्य सचिव |

सदर समिती मुलाखतीअंती दरवर्षी १०० उमेदवारांची संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी निवड करेल. प्रवेश परिक्षा अभ्यासक्रम व प्रवेश परिक्षा मधील अधिकतम गुण तसेच इतर अर्हता याबाबत उचित बदल किंवा त्यास मान्यता देण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

**<u>उमेदवारांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधा :</u>**

१. पि.एच.डी चा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी दरमहा रु. ३१, ०००/- इतकी फेलोशिप जास्तीत जास्त पाच वर्ष किंवा विद्यापीठास प्रबंध सादर करण्याचा दिनांक या पैकी जे आधी घडेल त्या दिनांक पर्यंत.

२. आकस्मिक खर्च:

अ) कला, वाणिज्य, व्यवस्थापन, भाषा, सामजिक शास्त्रे या विषयामधील पी.एच.डी. या अभ्यासक्रमासाठी दर वर्षी रु. २०,५०० /- इतके आर्थिक अनुदान देण्यात येईल.

ब) विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र व इतर विषयामधील पी.एच.डी. या अभ्यासक्रमासाठी दर वर्षी रु. २५०००/- इतके आर्थिक अनुदान देण्यात येईल.

३. दिव्यांग उमेदवारांना रु. २०००/- दरमहा इतके सहाय्य अनुदान म्हणून अतिरिक्त देण्यात येईल.

४. सर्व उमेदवारांना खालीलप्रमाणे HRA ( घरभाडे भत्ता ) म्हणून देण्यात येईल.

अ) वस्तीगृहात राहणारे उमेदवार: विद्यापिठ / महाविद्यालय / संस्थेने राहण्यासाठी आकारलेले शुल्क

ब) वस्तीगृहात न राहणारे उमेदवार: वस्तीगृहान न राहणाऱ्या उमेदवारांकरिता शहरांनूसार फेलेशिपच्या खालीललप्रमाणात घरभाडे भत्ता देण्यात येईल.

१. झेड वर्ग शहर- ८ टक्के
२. वाय वर्ग शहर- १६ टक्के
३. एक्स वर्ग शहर - २४ टक्के

**अर्थ सहाय्याचा कालावधी :-**

अ) अनुसूचित जमाती अधिछात्रवृत्तीचा कालावधी हा पी.एच.डी. करिता नोंदणीच्या दिनांकापासून ते संशोधन प्रकल्प विद्यापीठात सादर होण्याच्या तारखेपर्यंत किंवा नोंदणीनंतर पाच वर्षे यापैकी जे आगोदर होईल तो कालावधी असेल.

ब) पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यापीठ/ महाविद्यालय/ संस्थेने मुदतवाढ दिल्यास पाच वर्षापलीकडे होणाऱ्या मुदत वाढीकरिता आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेमार्फत कोणत्याही परिस्थितीत अधिछात्रवृत्तीस मुदतवाढ देण्यात येणार नाही.

क) उमेदवार व्यक्तीने कोणत्याही कारणाने नोंदणी दिनांकापासून ते विद्यापिठात पी.एच.डी. करिता रुजू दिनांकापर्यंत कालावधीत गॅप घेतला तर उमेदवारास स्वयंस्पष्ट कारणासह संबंधित विद्यापीठ महाविद्यालय संस्थेकडून गॅप प्रमाणपत्र आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

ड) संबंधित गॅप कालावधीसाठी आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेमार्फत कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य दिले जाणार नाही.

**अर्थ सहाय्य वितरण :-**

- निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमुन्यातील सर्व कागदपत्रे जमा केल्यानंतर दर तीन महिन्यातून एकदा असे एकूण तीन महिन्याचे एकत्रित फेलोशिप व आकस्मिक भत्ता (वार्षिक एकदाच) अशा पद्धतीने अधिछात्रवृत्तीचे वितरण करण्यात येईल.
- उमेदवाराने पी.एच.डी. करिता दोन वर्षे पूर्ण केल्यानंतर संबंधित संस्थेतील / विद्यापीठ / महाविद्यालयामधील मूल्यांकन समितीकडून संशोधन प्रक्रियेचे मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. सदर मूल्यांकन प्रक्रिया दोन महिन्याच्या आत होऊ न शकल्यास संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय/ संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडून विलंब झाल्याबाबत स्वयंस्पष्ट कारणासह अहवाल सादर करावा. सदर अहवाल मान्य झाल्यानंतर पुढील तीन वर्षासाठीची शिष्यवृत्ती देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. शेवटच्या सहा महिन्यांची शिष्यवृत्ती व इतर भत्ते हे संशोधन प्रकल्प पूर्ण करुन तो विद्यापीठात सादर केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच देय असतील. लाभार्थ्यास पी.एच.डी. घोषित झाल्यावर शोध प्रबंध व पी.एच.डी. घोषित झाल्याचे प्रमाणपत्र आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेस सादर करणे बंधनकारक राहील.

**उमेदवाराचे स्थलांतर :-**

संशोधन करण्याकरिता विद्यापीठ संस्था महाविद्यालय यात बदल केला असल्यास त्या बाबत आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेस उमेदवाराने माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच असा बदल केवळ एकदाच अनुज्ञेय असेल. त्यानंतर होणारा बदल ग्राह्य धरला जाणार नाही व त्यासाठी अर्थसाह्य देण्यात येणार नाही.

**अर्थसहाय्यासाठी आवश्यक विवरणपत्रे / कागदपत्रे :-**

१) **रुजू प्रमाणपत्र :-** उमेदवार व्यक्तीने विद्यापीठ/ संस्था/ महाविद्यालयाचे रुजू प्रमाणपत्र मार्गदर्शक व संशोधन केंद्रप्रमुख यांच्या संयुक्त स्वाक्षरीने व इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेत सादर करावे. परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२) **रोजगार कार्यमुक्त अहवाल :-** जे उमेदवार अंतिम निवड होण्या आधी रोजगार करीत असतील त्यांनी रोजगार करीत असलेल्या आस्थापनेकडून कार्यमुक्त केल्याचा अहवाल रुजू प्रमाणपत्रा सोबत सादर करावा.

३) **अर्धवार्षिक प्रगती अहवाल :-** नोंदणीच्या दिनांकापासून दर सहा महिन्यांनी लाभार्थ्याने संशोधनाचा प्रगती अहवाल असे दोन अर्ध वार्षिक प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

४) **आकस्मिक खर्च भत्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र** :- लाभार्थ्याने दरवर्षी नोंदणीच्या दिनांकापासून वर्षपूर्ण होताच आकस्मिक खर्चाच्या भत्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

५) **मुदतवाढ प्रमाणपत्र :-** विद्यापीठ महाविद्यालय संस्था यांनी पी.एच.डी. करिता मुदतवाढ दिली असल्यास मुदतवाढ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६) **हजेरी प्रमाणपत्र** :- मार्गदर्शकाकडून हजेरी प्रमाणपत्र प्रमाणित करून देणे बंधनकारक आहे.

७) जर एखाद्या उमेदवाराने विहित वेळेत संशोधन पूर्ण केले नसेल अश्या उमेदवाराच्या मुदत वाढीबाबतच्या कारणमीमासेचा विचार करून याबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा निर्णय अंतिम असेल. सदरची फेलोशिप हि कमाल ५ वर्षे करिताच असल्याने मुदतवाढी मध्ये उमेदवारास फेलोशिप किंवा इतर कोणताही खर्च देय राहणार नाही.

८) संशोधन पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र/ सुरु असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९) पी.एच.डी. घोषित झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**उमेदवाराची निवड रद्द करणे :-**

१. चुकीची व असत्य कागदपत्रे सादर करण्यात आल्यास.

२. उमेदवारास इतर संस्था/ विद्यापीठ/ महाविद्यालय किंवा इतर स्त्रोतांमधून संशोधन भत्ता मिळत असल्यास.

३. उमेदवार योजनेचा लाभ घेताना रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत असल्यास.

४. उमेदवाराने कोणत्याही कारणाने मध्येच पी.एच.डी. सोडल्यास.

५. उमेदवारांची संशोधन कार्यातील प्रगती समाधानकारक न आढळून आल्यास.

६. उमेदवाराने इतर कागदपत्रे / अहवाला बाबत संशयास्पद / फसवणुकीचे वर्तन केल्यास.

७. उमेदवाराने सदर कामात कोणत्याही बाह्यस्थ संस्थेचा/ संघटनेचा दबाव आणल्यास/ तसा पत्रव्यवहार केल्यास.

८. तद्वतच अधिछात्रवृत्तीचा अर्ज विद्यापीठाच्या विभागप्रमुख किंवा सक्षम अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावा. परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९. उमेदवाराने उपस्थिती व प्रगतीबाबतची विहित नमुन्यातील माहिती ( आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सदर नमुना तयार करावा ) सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने सादर केल्यानंतरच उमेदवारास पी. एच. डी. संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गतचे अर्थसहाय्य अदा करण्यात येईल. त्याचप्रमाणे पी. एच. डी. सुरु असताना उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्यांकडून दर सहा महिन्यांनी मुल्यमापन करुन त्याचा प्रगती अहवाल विभागास सादर करण्यात यावा. अन्यथा त्याची निवड रद्द करण्यात येईल.

१०. सदर फेलोशिपसाठी उमेदवाराची किमान ७५ टक्के हजेरी असणे बंधनकारक आहे. सबंधित प्रशिक्षण संस्थेकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थितीपत्रक प्राप्त झाल्यावरच प्रशिक्षणार्थीच्या बँकखाती विद्यावेतनाची रक्कम D.B.T. द्वारे विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. कोणत्याही प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षणास उपस्थित न राहता अथवा ७५ टक्केपेक्षा कमी हजेरी असल्यास विद्यावेतनासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेवर दबाव आणल्यास सदर प्रशिक्षणार्थीस अपात्र ठरवण्यात येईल.

**इतर बाबी :-**

१) पी.एच.डी. प्रकल्प पूर्ण न करू शकणाऱ्या संशोधकांकडून व विद्यापीठाकडून पीएच.डी. संशोधन गळती संदर्भातील सविस्तर अहवाल मागवून मूल्यमापन करण्यात यावे. अदा केलेली रक्कम समितीच्या निर्णया नुसार परत घेण्यात येईल.

२) पी. एच. डी. प्रकल्प पूर्ण करण्याबाबतचे हमीपत्र पात्र उमेदवारांकडून सुरवातीलाच घेण्यात येईल. हमीपत्र दिल्याप्रमाणे उमेदवाराने पी. एच. डी. पूर्ण न केल्यास त्यांना देण्यात आलेले पी. एच. डी. संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गतचे लाभ त्यांच्याकडून वसूल करण्यात येतील.

३) संशोधकाकडे अनुसूचित जमातीचा असल्या संबंधीचे जमात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र विद्यापीठाकडे आणि संस्थेकडे सादर करणे अनिवार्य असेल.

४) उमेदवाराने निवडलेल्या व विद्यापीठाच्या निवड समितीने मंजूर केलेल्या विषयात मंजूर मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण वेळ संशोधन कार्य करावे लागेल.

५) अधिछात्रवृत्ती मिळविण्याच्या कालावधीत पी. एच. डी. साठी निवडलेला संशोधन विषयात सुधारणा केली जाऊ शकते. परंतु सदर विषय संपूर्णपणे बदलता येणार नाही. जर उमेदवारास विषय बदल करावयाचा असेल तर त्यांनी या विषयी संस्थेस तात्काळ कळवावे व त्यांची मंजुरी घ्यावी. याबाबतचा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा निर्णय उमेदवारास बंधनकारक असेल.

६) अधिछात्रवृत्तीत कोणताही बदल ताबडतोब विभागांच्या लक्षात आणून देण्यात यावा. उमेदवार व्यक्तीला कोणतीही पूर्ण-वेळ वा अर्ध-वेळ पगारी नोकरी स्वीकारण्याची परवानगी नाही किंवा कोणत्याही अन्य स्त्रोतांकडून वेतन, मानधन, शिष्यवृत्ती इत्यादी प्राप्त करण्याची परवानगी नाही. उपरोक्त अटींचा भंग झाल्यास सदर बाबीची पडताळणी केल्यानंतर कोणतीही सूचना न देता मंजुर करण्यात आलेली अधिछात्रवृत्ती बंद करण्यात येईल. तसेच या अंतर्गत पूर्वी दिलेले सर्व लाभ परत घेण्यात येतील.

७) जर एखाद्या कारणास्तव पीएचडी अभ्यासक्रम बंद केल्याच्या कारणास्तव अधिछात्रवृत्ती समर्पण करण्याची इच्छा असेल तर अशाप्रकारात १५ दिवसांच्या आत तसे लेखी स्वरुपात संस्थेला कळवण्यात यावे. तसेच संस्थेमार्फत देण्यात आलेले सर्व प्रकारचे आर्थिक लाभ संस्थेस परत करण्यात यावेत.

८) पी. एच. डी. संबंधित कोणत्याही परीक्षेत उमेदवाराची प्रगती समाधानकारक नसल्यास अधिछात्रवृत्ती मागे घेण्यात येईल.

९) उमेदवाराला परिषदेच्या कार्यशाळेच्या सादरीकरणाच्या बैठकीत किंवा इतर कोणत्याही प्रसंगी किंवा अधिछात्रवृत्ती कार्यकाळात अशा विभागांकडून आयोजित कार्यक्रमास उपस्थित रहावे लागेल, ज्यासाठी कोणताही टीए / डीए प्रदान केला जाणार नाही.

१०) संशोधन कालावधीत मुदत वाढविल्यास संबंधित विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यकाळात पीएचडी पूर्ण करतील किंवा पुढील माहितीसाठी सक्षम प्राधिकरणाकडून विभागाकडे विस्तार प्रमाणपत्र सादर करेल. अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र उमेदवाराने सादर केले पाहिजे.

११) विभाग अधिछात्रवृत्ती संदर्भात आवश्यकतेनुसार अतिरिक्त अटी व शर्ती जोडू शकेल जे फेलोवर बंधनकारक असेल.

१२) अधिछात्रवृत्ती संदर्भात काही वाद उद्भवल्यास आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच तो निर्णय सबंधित उमेदवारावर बंधनकारक असेल.

**खर्चाचे अंदाजपत्रक:**

प्रस्तुत योजनेसाठी प्रति वर्ष १०० उमेदवार यांप्रमाणे पहिल्या ५ वर्षांसाठी येणाऱ्या खर्चाचा तपशिल जोडपत्र ब प्रमाणे आहे. पाचव्या वर्षापासून ५०० लाभार्थ्यांसाठी साधारणत: रु. २४,८७,४५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>विवरणपत्र-ब</u>

शासन निर्णय क्र.अछावृ-२०२२/प्र.क्र.१३४-का/१९,दि .३ फेब्रुवारी ,२०२३ चे विवरण पत्र

| अ.क्र. | बाब | पहिल्या वर्षाचा खर्च (१०० उमेदवार) रु. | दुसऱ्या वर्षाचा खर्च (२०० उमेदवार) रु. | तिसऱ्या वर्षाचा खर्च (३०० उमेदवार) रु. | चौथ्या वर्षाचा खर्च (४०० उमेदवार) रु. | पाचव्या वर्षाचा खर्च (५०० उमेदवार) रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पि. एच. डी. साठी फेलोशिप (दरमहा रु. ३१०००/) | ३,७२,००,००० | ७,४४,४४,००० | ११,१६,००,००० | १४,८८,००,००० | १८,६०,००,००० |
| २ | आकस्मिक खर्च रु. २५,०००/- वार्षिक | २५,००,००० | ५०,००,००० | ७५,००,००० | १,००,००,००० | १,२५,००,००० |
| ३ | दिव्यांग उमेदवारांना रु. २०००/- सहाय्य अनुदान ( अंदाजे १० उमेदवार) | २,४०,००० | ४,८०,००० | ७,२०,००० | ९,६०,००० | १२,००,००० |
| ४ | घरभाडे ( सरासरी फेलोशिपच्या २० टक्के) | ७४,४०,००० | १,४८,८०,००० | २,२३,२०,००० | २,९७,६०,००० | ३,७२,००,००० |
| अ | एकूण | **४,७३,८०,०००** | **९,४७,६०,०००** | **१४,२१,४०,०००** | **१८,९५,२०,०००** | **२३,६९,००,०००** |
| ब | जाहिरात खर्च, प्रवेश परिक्षा, प्रशासकिय व अन्य खर्चासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांना एकूण खर्चाच्या ५ टक्के निधी | २३,६९,००० | ४७,३८,००० | ७१,०७,००० | ९४,७६,००० | १,१८,४५,००० |
|  | एकूण अ+ब | **४,९७,४९,०००** | **९,९४,९८,०००** | **१४,९२,४७,०००** | **१९,८९,९६,०००** | **२४,८७,४५,०००** |